# अत्यंत भन्नाट आणि अत्यंत संथ -- निळू फुले

**-- चं.प्र.देशपांडे.**

**ज**गाची -- आयुष्याची -- निर्णायक संगती लावण्याचा प्रयत्न करणं हा वेडेपणा आहे. कुठल्याही प्रश्नाला कोणतंच निश्चित आणि शेवटचं उत्तर असत नाही. आणि शेवटी एवढंच निश्चितपणे वाटायला लागतं की हा सगळाच एक न संपणारा गोंधळ आहे... माणसामाणसांतली नाती...कला... कलावंत आणि प्रेक्षक यांच्यांतले संबंध... सगळ्या गोष्टींचे उद्देश आणि अर्थ...हा गोंधळ हाच एक कलेचा विषय होऊ शकणार नाही का ?...

**सं**पूर्ण नाव -- नीलकंठ कृष्णाजी फुले. या नीलकंठाचा नीलकंठरावही झाला नाही आणि नीलकंठही राहिला नाही -- ' निळू ' झाला. एखाद्या नीलकंठाचा निळू होण्याची अनेक कारणं असू शकतात... इथं मात्र सामान्य माणसातला सामान्यपणा आणि प्रेम यांचा मिलाफ हेच कारण आहे. या गोष्टी मुद्दाम गृहीत धरायचंही कारण नाही. त्या तशाच आहेत. म्हणूनच स्वतः फुले आणि त्यांच्याशी संबंधित माणसं या सगळ्यांच्याच हातून अभावितपणेच या नीलकंठचा निळू झालेला आहे. ( गदी काही वेळेला त्याला सरळ ' संत निळोबाराय ' म्हणतात.)

**ए**क रेकॉर्डर. एका मोठ्या नाट्यसंस्थेकडून दुसऱ्या मोठ्या नाट्य व्यक्तीनं आठशेला घेतला. पण नंतर त्या व्यक्तीनं तो परत केला. कारण असं सांगितलं की त्या रेकॉर्डरचा पायगुण चांगला नाही. तो घेतला आणि दुसऱ्याच दिवशी त्या व्यक्तीच्या मित्राच्या छातीत कळ आली.( असणार सगळं बंडल आणि भाबड्या चावटपणाचा प्रकार, पण पुढे...) त्यामुळं आता तो पुन्हा विकाऊ आहे. हवाय का कुणाला ?

राम नगरकर उठतात. ' काय निळ्या, घेतलास का ? घ्यून टाक, घ्यून टाक.' निळू न बोलता सगळीच भंकस एंजॉय करतोय. ' नाहीतर आपण घेतो.'-- नगरकरांची धमकी. ' आणि माझा जिगरी दोस्त कोण ... ' नजर मिस्किल चिंतातूरपणे निळूवर. निळू पटकन म्हणतो, ' ते आता कळ आल्यावरच समजणार ...'

**चि**रंजीवांचा नंबर तिसरा. एक मोठी बहीण आणि एक मोठा भाऊ. वडिलांचा मंडईत गाळा होता. काही दिवस त्यांनी ट्रकचा धंदाही केला. आर्थिक परिस्थिती एकूण बरी होती. वीसबावीस वर्षांपर्यंत कसल्याही चिंता कटकटी नव्हत्या.

बालवर्गापासून तिसरीचौथीत जाईपर्यंत हा मुलगा मध्यप्रदेशात काकांकडे होता. ते स्टेशनमास्तर होते. मुल्तापीर, मूर्तिजापूर आणि जालंब ही तिथली स्थित्यंतरं.

कुठलंतरी आडवळणी गाव असायचं. छोटंसं स्टेशन. बहुतेक गाड्या न थांबता धाडधाड निघून जायच्या. कुठंतरी संध्याकाळच्या वेळी एखादी पॅसेंजर यायची आणि थांबायची. शुकशुकाटी गाव तसंच शुकशुकाटी स्टेशन. संध्याकाळी हा स्टेशनवर जाऊन बसायचा. स्टेशनमास्तर, एकदोन माणसं आणि एकदोन पोर्टर इतकीच माणसं असायची. आणि मग थोड्याच वेळात ती थांबलेली गाडी सुटाची. हळूहळू हळूहळू निघून जायची. शेवटी तिचा एक ठिपका होऊन नाहीसा व्हायचा.

आणि मग तिथं जी एक पोकळी निर्माण व्हायची...जो एकाकीपणा आणि उदासीनता पसरायची...

त्या सर्वांचा एक खोल ठसा निळूच्या मनावर आहे. त्या गोष्टी तेव्हा जितक्या गंभीरपणे जाणवल्या तितक्याच गंभीरपणे आताही त्या आठवण म्हणून जाणवतात...

' देवदास ' ( जुना ) या चित्रपटाच्या दिग्दर्शनाबद्दल बोलताना निळू म्हणाला की या चित्रपटात रूळांच्या खडखडाटाचा जो उपयोग केलेला आहे तो विशेष आहे... त्यामुळं चित्रपटाला एक उदास लय आली आहे... हे सांगून मग मधेच तो म्हणाला की हे मला विशेष प्रकर्षानं जाणवलं याचं कारण कदाचित माझी ती स्मृतीही असेल, पण ...अधिक

काही बोलला नाही.

तेव्हाचीच आणखी एक गोष्ट म्हणजे तिथल्या आदिवासी लोकांचा सहवास. निळू त्यांच्यात जायचा...त्यांची गाणी ऐकायचा...त्याला ते सगळं आवडायचं...

त्या वयात म्हणजे सुमारे साताठ वर्षांचा असताना तिथल्या लोकनाट्याचा प्रकार असलेले नौटंकीचे कार्यक्रमही तो पाहात असे. ते ज्या रामायणातल्या वगैरे कथा करीत... ते सगळं त्याच्या अजून लक्षात आहे...

निळूची शालेय शिक्षणाची सुरुवात अर्थातच हिंदीतून झालेली आहे. हिंदीचा आग्रह धरणारा संयुक्त समाजवादी पक्ष आणि निळू यांचे संबंध आणि त्याच्या शिक्षणाचं सुरुवातीचं माध्यम यांचा स्वतंत्र असा तुटका संबंध पाह्यचं काही कारण नाही, पण ही एक त्याच्या आयुष्यातली संगती. निळू हिंदी फार छान बोलतो. ( उद्या तो तुम्हाला हिंदी चित्रपटांत दिसला तर काहीही आश्चर्य वाटायचं कारण नाही. ) आणि एकूणच बोलतोही प्रभावी.

तो पुण्याच्या आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजात माळी म्हणून नोकरीवर असतानाचा प्रसंग. तिथं वर्षातून एकदा एक दरबार भरायचा. सगळा अधिकारीवर्ग, कारकूनवर्ग आणि कामकरीवर्ग हजर असायचा. सगळ्यांच्याच अडीअडचणी, सोयी- गैरसोयींचा विचार व्हायचा. हे सगळं जरी असलं तरी बोलायचं कुणी हा प्रश्न असायचा. पगारवाढ मागायला पाहिजे हा विचार बराच काळ या लोकांच्या डोक्यात होता. पण हा म्हणजे गळ्यात घंटा बांधण्यासारखाच प्रकार. त्यामुळे आपसात सगळेच बोलायचे पण जाहीरपणे कुणीच बोलायचं नाही.

निळूनं ही जबाबदारी घेतली. अतिशय फर्ड्या आणि ओघवत्या हिंदीत निळूनं अधिकाऱ्यांपुढे लोकांचे प्रश्न मांडले आणि शेवटी पगारवाढीची मागणी केली.

सगळे खूष झाले. हा माळी इतकं कुठलं बोलतोय म्हणून काहीजण चकित झाले. एका अधिकाऱ्याला संशय आला की बहुतेक हा कम्युनिस्ट असणार. त्यानं निळूला निरोप पाठवला की उद्या बंगल्यावर भेटा.

निरोप समजल्यावर मग खुषीतले लोक हळहळायला लागले. झालं हे सगळं चांगलं झालं खरं पण आता हा साहेब याला उडवणार या शंकेनं ते कष्टी झाले. पण इलाज नव्हता.

निळूवर अर्थातच याचा काहीही परिणाम झालेला नव्हता. दुसऱ्या दिवशी तो साहेबाच्या बंगल्यावर गेला. साहेबानं त्याला आत बोलावलं. तो आत गेला. मग साहेब म्हणाला, बसा. हा जमिनीवर बसायला लागला. नाही, नाही, इथं बसा असं म्हणत साहेबानं त्याला खुर्चीवर बसायला लावलं. बोलण्यातून, तो कम्युनिस्ट नाही याबद्दल साहेबाची खात्री झाली. मग बराच वेळ दोघेजण बोलत बसले. निळूचे विचार, त्याचं बोलणं -- सगळ्यांनी साहेब प्रभावित झाला.

निळूला काढलंबिढलं तर काही गेलं नाहीच पण उलट कामाच्या तासातले दोन तास त्याला वाचनासाठी वगैरे देऊ केले गेले.

कम्युनिझमबद्दल निळू म्हणतो, त्यांच्या बऱ्याच गोष्टी तत्त्व म्हणून मला पटतात. पण त्यांचा टोकाचा सैध्दांतिकपणा आणि एखाद्या धार्मिक कर्मठपणासारखाच ठोकळेबाज कट्टरपणा मला मान्य होऊ शकत नाही. कारण त्यातून वस्तुस्थितीकडे डोळेझाक होते.

निळूचं पुढचं आयुष्य पुण्यातलंच. शिवाजी मराठा हायस्कूल. उरलेलं -- म्हणजे अकरावीत शाळा सोडेपर्यंतचं शालेय शिक्षण या शाळेत. अभ्यासात वगैरे यांना जरा रस कमीच होता. पास होणे बास. बाकी दोस्तांचा कंपूही तसलाच होता. इतर हुषार पोरांशी स्वतःची तुलना करून खट्टू होण्याचाही प्रश्न नव्हता. चालू असलेलं चालू होतं आणि या वैतागातून एकदाचं सुटावं एवढा मात्र या दोस्त मंडळींचा एकमुखी निर्णय होता.

शाळेत सेवादलाची खूप मुलं होती. त्यांच्यातल्याच कुणाकुणाच्या नादानं हा प्रथम सेवादलात गेला. त्याचं काही डोळसपणे विचार करून केलेली निवड असं स्वरूप त्यावेळी नव्हतं. नंतर सेवादलाची बौध्दिकं वगैरेंतून अधिक विचार सुरू झाला. मार्क्सवाद, रॉयवाद वगैरे गोष्टींचा अभ्यास होऊ लागला.

तोपर्यंत, आपण अभिनय क्षेत्रात काही करावं वगैरे विचार याच्या डोक्यात कधीच आले नव्हते. पुढे सेवादलाच्या कलापथकाच्या निमित्तानं या गोष्टी सुरू झाल्या.

**नि**ळूचं घर असं मजेदार आहे की बास. आता याहून खूपच मजेदार घरांतून भारताची जनता राहते ही गोष्ट खरीच. सकाळची वेळ. दोन सिगरेटींचा धूर. तो आणि त्याचा एक व्यवसायमित्र. घरातून धूर हलता हलणार नाही. निळूच्या बोलण्यातला संथ -- शांतपणा आणि या धूराचा भरीवपणा यांचा एक घनिष्ट संबंध जाणवायला लागतो. दौऱ्यापूर्वीची आखणी चाललेली असते. कुठून कशा एस.टच्या आहेत, वगैरे.

निळूच्या घराचं आणखी एक वैशिष्ट्य. कदाचित हे निळूचंच म्हणता येईल. ते म्हणजे चहा. मधूनमधून सारखा चहा येत राहणार. म्हणजे माणसं बोलत असताना, एक तर तुम्हाला त्यांच्या जवळ संपवलेल्या कपबशा दिसतील किंवा त्यांच्या हातात तरी दिसतील किंवा आतून बाहेर येत असलेल्या दिसतील. बोलणंबिलणं सगळं असं घोटा-घोटानं-चवीचवीनं.

इतके दिवस त्याच्या डोक्यात विचारही आला नव्हता की आपल्याला लिहाय-वाचायला एक स्वस्थ खोली असावी. आता त्याच्याही डोक्यात हा विचार आलेला आहे आणि कुणीतरी त्याला ती मिळवून देण्याच्याही प्रयत्नात आहे.

**सा**धारणपणे आठवत असल्यापासून निळूचा सेवादलाशी संबंध आला. नंतर मॅट्रिकला न बसताच शाळा सोडली. समोर तसा काहीही कार्यक्रम नव्हता. अमुकच काही करायचं असं ठरलेलं नव्हतं. पुढचं पाऊल टेकवल्यावर किंवा ते टेकण्याची खात्री असल्यावर उचललेलं हे पाऊल नव्हतं. देता येण्यासारखं कारण म्हणजे कंटाळा हेच. पण यातून घेतलेला हा निर्णय मूर्खपणाचा म्हणता येण्यासारखा नव्हता. मूर्खपणापेक्षा त्यात जाणूनबुजून स्वीकारलेली बेफिकिरीच अधिक होती.

पण नंतर हळूहळू दिशा ठरू लागली. सेवादल आणि संयुक्त समाजवादी पार्टी यांच्या कामाला तो वाहून घेऊ लागला. आणि मग तीच आयुष्याची निश्चित दिशा ठरली.

**ए**का अर्थाने निळू शाळेपासून पळालाच. पण अक्षरशः पळून जाण्याचे प्रकार त्यानं दोनदा केलेले आहेत.

शाळेत असताना तो आणि त्याचा एक मित्र दोघेजण आपापला इतिहास, भूगोल, बीजगणित वगैरे विकून कोल्हापूरला पळाले. कोल्हापूरला गेले ते अगदी सरळसरळ एका स्टुडिओत. कलेबिलेच्या क्षेत्रात उतरण्याच्या कल्पना नव्हत्या. चित्रपटक्षेत्र हे काही ना काही नोकरी मिळण्याचं खात्रीचं ठिकाण आहे असं दोघांच्याही डोक्यांनी घेतलं होतं. त्यांनी खटपटी केल्या. कुणी त्यांना उभंसुध्दा करून घेतलं नाही. शेवटी भ्रमनिरास होत्साते दोघंही परत आले.

**नि**ळूचे काही दिवस लोखंडी सामानाच्या दुकानात गेले. त्यानंतर तो एका धान्यदुकानाच्या सोसायटीत कामाला होता. त्या नोकरीचे त्याला तीस-पस्तीस रुपये मिळत. घरच्या कटकटी, आर्थिक तंगी याला स्वारी वैतागली. दुकानाचे शंभर रुपये घेऊन आणि ' मी जात आहे, त्याचे पैसे फेड करावे ' असा निरोप घरी पाठवून वीर तडक मद्रासला पळाले.

तिथं पंडित इंद्र म्हणून एक पटकथा लेखक होते. निळूच्या एका मित्राची न् त्यांची ओळख होती. आणि निळूला अशी माहिती मिळालेली होती की तिकडं चित्रपटक्षेत्रात तंत्रज्ञ वगैरे दृष्टींनी मराठी माणसांना खूप वाव आहे. शिवाय या वेळी, चित्रपट क्षेत्रात शिरावं असे विचारही स्पष्टपणे त्याच्या डोक्यात होते. आता तो म्हणतो की कदाचित या व्यवसायाचे आकर्षणही त्याला कारणीभूत असेल.

पण ते काहीही असलं तरी त्या बाबतीत त्याला अपयशच आलं.

त्यानंतर तो खूप आजारी पडला. इतका की त्याला पाहून एखाद्या मित्राच्या डोळ्यांत पाणी तरारावं.

**से**वादलाचं आणि पार्टीचं काम हे निळूचं आयुष्य ठरून गेलं. त्या दृष्टीनं त्यानं काही निर्णयही घेतले. आपल्याला हवं ते कार्य करायचं तर मागं कुठलं संसाराचं वगैरे झंगट असता कामा नये. तर लग्न करायचं नाही.

पुढं कदाचित या निर्णयाची कारणं बदलत गेली असावीत किंवा वाढत गेली असावीत. म्हणजे लेखन-वाचन-नाट्य
-- यांसाठी हवा असलेला मुक्तपणा. वगैरे.

या काळात निळूनं त्याच्या एका मित्राला ( श्री.बोराटे ) लिहिलेलं एक सविस्तर पत्र त्याच्या आयुष्याचा सगळा पट दाखवणारं आहे.

त्या काळात निळू टागोरांच्या एका कथेवरून एक नाटक लिहीत होता. त्यानं तो झपाटला गेला होता. पत्रात त्यानं नाटकाची थोडक्यात मांडणीही दिली आहे. गंमत अशी की डॉक्टर आणि अवाबेन यांच्याकडून स्पष्ट अभिप्राय मिळावे म्हणून त्यानं त्यांना थाप ठोकली होती की माझा यतीन दास नामक एक मित्र टागोरांची कथा नाटकात रूपांतरित करतोय. नाटकाबद्दल सगळं लिहून झाल्यावर निळूनं पुन्हा लिहिलंय, ' हे असं सगळं आहे. पण लेखक यतीन दास एवढं लक्षात ठेव. तू येईपर्यंत बहुतेक ते पुरं होईल .'

निळूनं लग्न न करण्याचा निर्णय घेऊन काही काळ लोटलेला होता. आणि मधेच त्याचं एका मुलीशी प्रकरण सुरू झालं होतं. त्यानं तिला काही पत्र पाठवलं. उत्तर आलं नाही. मग त्यानं क्षमायाचनेचं पत्र पाठवलं. पुन्हा उत्तर नाही.

हे सगळं लिहून मग निळूनं लिहिलंय, ' चंदू, मी लग्न न करायचं ठरवलंय खर पण यातून मी पापी--वासनी आणि विकृत बनेन की काय याची मला कधीकधी भीती वाटते. पण या बाबतीत सगळ्या पोरींपुढं भिक्षापात्र घेऊन जाण्याची लाचारीही मला शक्य नाही. आणि याच्या बदल्यात मी मुद्दाम लेखन--नाट्य यासाठी स्वीकारलेल्या स्वातंत्र्याची किंमतही मला देता येणार नाही. मग त्यामुळं होणाऱ्या कुठल्याही मानसिक परिणामांची मला क्षिती नाही.'

**नि**ळूची नीतीअनीतीची, चांगल्यावाईटाची समज अशा प्रखर संघर्षातून आलेली आहे.

निळू सेवादलाचा एक निस्सीम कार्यकर्ता होता. मूळ कलापथकाची कल्पना त्याचीच. पुण्याचं कलापथक तो स्वतः पाहात होता. स्वतः कार्यक्रम बसवत होता. तालमी घेत होता. गल्लोगल्ली कार्यक्रम नेत होता.

कष्टाचं प्रमाणच नव्हतं. मेडिकल कॉलेजातला हा माळी दिवसभर अंगमेहनतीचं काम करून यायचा. नंतर लगेच सायकलवरनं फेरी निघायची. ' आज रात्री तालीम आहे '-- ' आज रात्री तालीम आहे '-- असं प्रत्येकाला सांगून स्वारी परतायची. मग जेवणबिवण केलं की पुन्हा तालमीला हजर. कधीकधी तर तो आणि आणखी कुणी एखाददुसरा एवढेच जमायचे. पण याच्या नेटावर काही परिणाम व्हायचा नाही.

कार्यक्रम असला की पुन्हा वेगळ्या स्वरूपाचे कष्ट. दिवसभर काम. रात्री कार्यक्रम, जागरण. पुन्हा दुसऱ्या दिवशी मातीशी दोन हात करायला हजर.

गणेशोत्सवात वगैरे ही सगळी मंडळी आपापली बोचकी आपापल्या डोक्या-खांद्यांवर घेऊन इकडच्या तिकडच्या गल्ल्यांतून, गावांतून कार्यक्रम करत फिरायची. पुढंपुढं वर्षातून सहा सहा महिने पथक फिरतीवर असायचं.

**नि**ळूच्या कंपूतला एकजण म्हणाला की निळूच्या कुवतीची त्या वेळी काही कल्पना नव्हती. अभिनयाच्या क्षेत्रात तो इतकी काही मजल गाठेल असं मुळीच वाटलं नव्हतं. त्याचा तो खप्पड चेहरा. निळा डगला आणि पायजमा ! सुरुवाती

सुरुवातीला हे ध्यान म्हणजे अगदी माकड वाटायचं...

**म**धेच निळूला विचारलं की आवडता रंग कोणता ? त्याच्या एकंदर स्वरूपावरून हा कुठला तरी सौम्य फिकट रंग सांगणार अशी कल्पना. पण त्यानं सांगितलं -- तांबडा भडक आणि पिवळा धमक. या दोन भडक रंगांचा उपयोग करून काढलेलं व्हिन्सेन्ट व्हॅन गॉगचं एक चित्र त्याला फार आवडलेलं आहे असंही त्यानं सांगितलं.

**नि**ळू तसं पाहिलं तर एकूणच धोक्याचं आयुष्य जगलेला आहे. ठराविक चौकटीत आमचं भलं झालं, ठीक झालं -- ही वृत्ती त्यानं कधीच स्वीकारली नाही. तडजोडींना आयुष्यात नकार दिला. आणि मग त्याच्या परिणामांचीही तमा केली नाही.

पण त्यामुळं घरात संघर्ष झाले नाहीत हे विशेष. घरच्या लोकांनी समजुतदारपणानं सगळं घेतलं.

निळूनंही नोकरी करायची नाही या आपल्या निर्णयाला काही काळ मुरड घातली. भाऊ शिकत होते -- अजून स्वतःच्या पायांवर उभे राहू शकत नव्हते -- त्या काळात निळूनं मेडिकल कॉलेजातली नोकरी केली. शेतीची, फुलांची आवड होती, एक वर्षाचा बागकामाचा कोर्स झालेला होता -- सगळं कारणी लागलं. कर्तव्य म्हणून नोकरीची जरूर संपली तेव्हा त्यानं ती सोडून दिली.

निळूची ही बेफिकीरी आणि सर्वसामान्य आणि समाजमान्य चाकोरी सोडतानाची निर्भय वृत्ती -- त्याच्या व्यक्तिमत्वाचं एक स्थायी वैशिष्ट्य आहे. लोक काय म्हणतील वगैरे विचारांना निळू फारशी भीक घालीत नाही.

समजा एखाद्या ठिकाणी चांगल्या ठुमऱ्या गाण्यारी बाई आहे असं कळलं तर तो अगदी न बिचकता तिथे जातो.

तमाशाचं - लोकनाट्याचं क्षेत्र नीती-अनीतीच्या बाबतीत बदनाम. ते त्याला विचारलं तेव्हा तो म्हणला की इथले लोक उलट अधिक निकोप असतात. लैंगिक आकर्षणाचे इथं प्रश्न होत नाहीत. मोकळेपणा असतो आणि त्या त्या गोष्टींना नाहकच जीवनमरणासारखं महत्त्वही चिकटवलं जात नाही. या मोकळेपणाला बंधनं असतात तीही प्रेमाची. उदाहरणार्थ मित्रप्रेमातून येणारी बंधनं.

परस्पर संमतीतून काही गोष्टी झाल्या तर त्यांना पाप मानायचं काहीच कारण नाही असं तो म्हणतो. या संदर्भात त्यानं आणखी एक गोष्ट सांगितली. नेहमी-नेहमीच्या नात्यांचा माणसांना कधीतरी कंटाळा येतो ही एक वस्तुस्थिती आहे. या गोष्टी समजून न घेता संबंधांची जोखडं करणं त्याला पटत नाही.

ज्या गोष्टींची ओढ वाटते त्या गोष्टी मी करतो हे त्यानं सरळ सांगितलं. उदाहरणार्थ एखादं ' औषध ' ( हा त्याचाच शब्द ) घ्यावंसं वाटतं, घेतो. भूक लागते. जेवण जातं. शीण जाणवेनासा होतो. झोप येते ... हे सगळे फायदे. म्हटलं तर हा थोडासा कमकुवतपणा असेल असंही तो म्हणाला.

स्त्रीपुरुष-संबंधांच्या बाबतीत बोलताना ' एक चद्दर मैलीसी ' ही कादंबरी फार आवडल्याचं त्यानं सांगितलं. 'आधे अधुरे ' हीही त्याची एक आवडती कलाकृती आहे.

निळूची ही सगळी मतं पाहताना एक गोष्ट अगदी निश्चितपणे ध्यानात धरायला हवी. ती म्हणजे आपणच निर्माण केलेल्या परिस्थितीला अनुकूल असं तत्त्वज्ञान निर्माण करून स्वतःचीच समजून घालण्याइतका निळू लेचापेचा आणि बालिश नाही.

**से**वादलात काम करणारी माणसं आणि सेवादलातून बाहेरच्या निरनिराळ्या क्षेत्रांत गेलेली माणसं यांच्यांत एक स्पष्ट असं नातं असावं हा सेवादलाचा एक अलिखित नियम होता. पण पुढंपुढं परिस्थितीचं चित्र फारच पालटलं. बाहेर नावलौकिक, पैसा मिळवणाऱ्यांना आतल्या कार्यकर्त्यांचं भान राहीनासं झालं. त्यातून आतल्या कार्यकर्त्यांची चांगलीच

कुचंबणा व्हायला लागली.

बाहेरचे हे यशस्वी लोक आपले सेवादलाशी असलेले संबंध अभिमानानं सांगत पण प्रत्यक्ष जेव्हा मदत करण्याचा, पैसे देण्याचा प्रश्न येई तेव्हा यांच्या कपाळावर आठ्या येत. त्या वेळी सेवादलात सुमारे चाळीस सर्ववेळ कार्यकर्ते होते. त्यांना महिना शंभर रुपये मिळत. पुढंपुढं या लोकांची इतकीही जबाबदारी घेणं दलाला जड जायला लागलं. या लोकांचं नोकरी शोधण्याचं वय गेलेलं आणि म्हणून बाहेरच्या वाटा बंद झालेल्या...या सगळ्यानंच या लोकांच्या आयुष्याला एक भयानक नाकेबंदीचं स्वरूप यायला लागलं.

या सगळ्यानं निळू उद्विग्न व्हायचा. सगळ्याचाच त्याला वीट यायचा. शेवटी साठत साठत आलेल्या या कारणांचा वाराणशीच्या अधिवेशनांत स्फोट झाला. मतभेद स्पष्ट झाले. आणि वेळीच निळू अनेक भयाण शक्यतांतून सुटला.

**नं**तर निळूनं पार्टीच्या कामाला अधिक वाहून घेतलं. पार्टीच्या माणसांत या दृष्टीनं अधिक संगती होती.

बबन शिंदे नामक एक पार्टीशी संबंधित गृहस्थ होते. त्यांना एक लोकनाट्य हवं होतं. शंकर पाटलांनी, त्यांचं सेवादलानं नाकारलेलं एक लोकनाट्य शिंद्यांना द्यायचं कबूल केलं. पण निळू फुले आणि राम नगरकर ही दोन माणसं त्यात घ्यायला हवीत या अटीवर. ते बसवायला सुरुवात झाली आणि त्याच सुमारास ' कथा अकलेच्या कांद्याची ' यानंही आकार घ्यायला सुरुवात केली. मग मात्र निळू सरळ सरळ धंद्यात आला.

**' कु**णाचा कुणाला मेळ नाही '-- नामू धोबी. ' बिनबियांचं झाड ' -- राजा आणि न्हावी . ' मास्तर एके मास्तर ' -- विनोदी शिक्षक . ' येरा गबाळाचे काम नोहे ' याचं स्वतंत्र लेखन आणि मारुतीची भूमिका. ' भलताच बैदा झाला '-- मिरासदारांच्या कल्पनेवरून लिहिलेलं लोकनाट्य. ' माझी बायको माझी मेव्हणी ' मधे सुरुवातीच्या काही प्रयोगांत संपादक. ' कथा अकलेच्या कांद्याची ' -- दारुड्या, शिक्षक, बीटनिक आणि मंत्री. ' लवंगी मिरची कोल्हापूरची ' -- हऱ्या. ' एक गाव बारा भानगडी ' त झेले अण्णा. आणि आता -- ' डोंगरची मैना ', गणगौळण ' आणि ' मुक्काम पोस्ट ढेबेवाडी '. काही नाटकांनी अलिकडे देऊ केलेल्या काही भूमिका नाकारलेल्या. कारण अर्थात आवडल्या नाहीत.

**सा**तारा -कोल्हापूर बाजूला ' झेले अण्णा ' नावाच्या रिक्षा पळतायत...

**अ**गदी प्रथम स्टेजवर उभं राहण्याचा प्रकार सेवादलातच. पुलंचं लोकनाट्य होतं, त्यात एक लहानशी भूमिका होती. बहुतेक प्रेक्षकवर्ग सेवादलाशी संबंधितच होता. त्यामुळं भीती अशी नव्हतीच. उलट आगाऊपणा करायची खुमखुमीच निर्माण झाली होती. हा अधिकाधिक आगाऊपणा करत होता. आणि लोक अधिकाधिक दाद देत होते...त्यातून त्यानं मग आगाऊपणाला दाद मिळते हा सारांशही काढून टाकला होता.

**नि**ळूच्या बाबतीत नाट्यकला ही काही अचानकपणे उद्भवलेली गोष्ट नव्हे. तमाशे, चित्रपट, नाटकं पाहण्याचं वेड पहिल्यापासूनच होतं. या पाहण्यातूनच चांगल्यावाईटाची समज वाढत होती. अमूक भूमिका अशी व्हायला हवी होती, अमूक हालचाली अशा हव्या होत्या, अमूक शब्दांची फेक अशी हवी होती -- या गोष्टी डोक्यात येत होत्या. प्रत्यक्ष स्टेजवर उभं राहण्यापूर्वी सुमारे दहा वर्षं आधीपासून निळू असा घडत होता.

चिंतामणराव कोल्हटकर, बाबूराव पेंढारकर, मा.विनायक, दामुअण्णा मालवणकर, जोग -- हे निळूला आवडलेले जुन्यातले नट.' सरकारी पाहुणे,' ' देव पावला,' ' अर्धांगी,' ' ब्रँडीची बाटली,' हे त्याला आवडलेले चित्रपट. आजकालचे खुळचट अंगविक्षेप आणि बालिश घटनांच्या विनोदांनी भरलेल्या चित्रपटांच्या पार्श्वभूमीवर तर हे चित्रपट निळूला अधिकच महत्त्वाचे वाटतात.

इंग्रजी चित्रपटांचं निळूचं वेडही खूप जुनं आहे. रोनाल्ड कोलमन, लेस्ली हॉवर्ड आणि चार्लस बोए हे त्याचे आवडते नट. ' डबल लाईफ ', जुना ' रोमिओ अँड ज्यूलिएट ', ' गॅस लाईट ' -- हे त्याला विशेष आवडलेले चित्रपट.

निळूनं अभिनयाचं पध्दतशीर शिक्षण वगैरे घेतलेलं नाही. पण असं तो घेत होता. नाट्यपरंपरेचा वगैरे जाणीवपूर्वक अभ्यासही केला नाही. पण तो असा नकळत झालाच.

**कि**सन कुसगावकर हा सोंगाड्या म्हणजे निळूला पुरेपूर पटलेला नट. हा माणूस स्टेजवर समूहात कधीही उभा राहात नसे. लांबून, जणू काय अलिप्तपणे त्याच्या कॉमेंट्स चालायच्या. या कॉमेंट्स् करताना सुध्दा लक्ष वेधून घेण्यासाठी वगैरे अशा कोणत्याही हालचाली तो करत नसे. वाणीवर त्याचं काम चाललेलं असायचं. त्याचं दुसरं एक वैशिष्ट्य सांगताना निळू म्हणाला की इतकं मिस्कील आणि इतकं उपरोधिक हसू शकणारा दुसरा माणूस मी पाहिलेला नाही.

**अ**भिनयासाठी शरीर तयार ठेवण्यासाठी विशिष्ट व्यायाम वगैरे प्रकारही निळूनं केलेले नाहीत. त्या त्या भूमिका करताना, त्या त्या हालचाली आणि लकबी आत्मसात करताना जे कष्ट पडले असतील तेच. इथे मात्र मग कसलीही कुचराई केली नाही. भूमिका समजून घ्यायच्या आणि ही माणसं अशी अशी असतील हे एकदा ठरलं की कामाला लागायचं. आपल्या दृष्टिपथात आलेल्या गोष्टी पूर्णपणे प्रत्यक्षात उतरेपर्यंत थांबायचं नाही.

प्रत्येक हालचाल, शब्दांची प्रत्येक फेक, शब्दाशब्दांमधलं प्रत्येक अंतर, आवाजाचा प्रत्येक चढउतार निळूनं पूर्णपणे अपेक्षित लयीत बसवलेला असतो.

स्टेजवर हे सगळंच सहज दिसतं.

**नि**ळूचं एक वैशिष्ट्य म्हणजे स्वतः मागे अनेक कंत्राटं लावून घेणं. कुणा एखाद्याला नोकरी हवी असेल तर ओळखी काढून अर्ज पोचता करणं वगैरे हा करणार. मधे तर एकदा हा टॅक्सीच्या जामिनाच्या लफड्यात सापडला. बाहेर पडता पडता पुरेवाट. काही कारणानं परवाच्या दौऱ्यात उषा चव्हाण येऊ शकली नाही तर या पठ्ठयानं लीला गांधीला विनवून आणून कार्यक्रम उभे केले, कारण दौरा कॅन्सल होणं म्हणजे अनेक पोटांचे त्रिशंकू. काही वेळेला वैयक्तिक भांडणातून एखादा प्रसिध्द नट वा नटी अमूक व्यक्ती असेल तर मी काम करणार नाही वगैरे म्हणू लागते. मग निळू चक्क भडकतो. वैयक्तिक भांडणासाठी लोकांना घरी बसवण्याची मग्रुरी त्याला खपत नाही. अशा वेळी निळू कडाडून भांडणार.

**भू**मिकेशी तद्रूप होणं वगैरेसंबंधी बोलताना निळू म्हणाला, तद्रूप होणं काय किंवा अलिप्त असणं काय दोन्हीही गोष्टी काही प्रमाणात खऱ्या आणि काही प्रमाणात खोट्या असतात. आपण काय करत आहोत याचीही जाणीव असते आणि प्रेक्षकांच्या प्रतिक्रियांकडेही लक्ष असतं.

दुसरी एक गोष्ट निळूनं सांगितली ती अशी की आपण जी त्याच्या अभिनयातली सहजता म्हणतो ती म्हणजे पूर्णपणे बसवलेल्या गोष्टींमुळे भासणारी चीज असते. पण तो म्हणतो की मी अभिनय करताना मनानं सहज कधीच नसतो. मनावर सतत एक दडपण असतं. विशेषतः गतीचं भान राखणारं दडपण. काहीही नवीन करत असताना हे ताण असतातच.
सवयीनं हे ताण नाहीसे होत जातात. आणि जसजसे हे ताण नाहीसे होत जातात तसतशी अभिनयात रिजिडिटी येत जाते. अभिनय यांत्रिक होत जातो. ही दडपणं असतात तेव्हाच मला खरा कलेचा आनंद मिळतो. मी जेव्हा खरोखर माझा अभिनय करतो तेव्हा मला फार शीण येतो.

म्हणूनच निळू म्हणतो की खरं म्हणजे शंभर प्रयोगांनंतर अभिनयात काही शिल्लक राहात नाही. त्यानंतर प्रयोग बंद करणंच खरं. पण धंदा तर त्यानंतरच अधिक जोराचा असतो. त्यामुळं या गोष्टी हातात नसतात.

मग अभिनय म्हणजे आपल्या प्रेमाची कुणी विशेष व्यक्ती आली वगैरे तरच. मुंबईच्या ' कथा अकलेच्या कांद्याची ' च्या एका प्रयोगाला हृषिकेश मुखर्जी आले होते. त्या प्रयोगात हे ताण पुन्हा बहरले.

**क**ला आणि प्रचार यांसंबंधी बोलताना निळूनं सांगितलं की कलाक्षेत्रात तो स्वतःची राजकीय मतं आणत नाही.

म्हणजे असं की त्याला न पटणाऱ्या विचारांच्या लेखकानं लिहिलेल्या किंवा तशा विचारांचा थोडाफार प्रचार करणाऱ्या लोकनाट्यातही तो काम करतो. त्याच्या पार्टीचाही कलेबद्दलचा दृष्टीकोण असाच आहे. ज्यालात्याला आपापली मतं असतात आणि त्यात आपण हस्तक्षेप करणं बरोबर नाही. त्यामुळं निळू म्हणतो की मी स्वीकारलेल्या भूमिकेचाच विचार करणं मी महत्त्वाचं मानतो.

कला, प्रचार आणि सेवादलाचे कार्यक्रम यांसंबंधी विचारता तो म्हणाला की सेवादलात वसंत बापट, सदानंद वर्दे अशी समजदार माणसं होती. त्यांनी कुठलाही कार्यक्रम लोकांना प्रचारकी वाटता कामा नये याची काळजी घेतली. निरोगी कलात्मक दृष्टिकोण त्यांनी अधिक महत्त्वाचा मानला. त्यांनी प्रचाराची जशी कलेवर कुरघोडी होऊ दिली नाही तशीच वाह्यातपणाची आणि थिल्लरपणाचीही होऊ दिली नाही. इथल्या संस्कारांची कलात्मक प्रौढत्व यायला खूप मदत झाली.

**से**वादलाचे संस्कार, इतर कलाकृतींचे आणि अभिनेत्यांचे संस्कार यांबरोबरच निळूनं ' रंगायन ' च्या नाटकांचाही विशेष उल्लेख केला. त्यानं ' रंगायन ' ची सगळी नाटकं पाहिलेली आहेत. स्वाभाविकतेला आणि सहजतेला महत्त्व देणारा अभिनय हे ' रंगायन ' चं निळूला विशेष जाणवलेलं वैशिष्ट्य.

**बा**लगंधर्वात ' कथा...' होती तेव्हाचा ग्रीनरूममधला प्रकार. कुणी ना कुणी येऊन सारखं बाहेर चाललेला महेशकुमार अँड पार्टीचा कार्यक्रम लावत होतं आणि निळू 'अरे नको रे ' किंवा ' जरा बारीक रे ' म्हणत ते बंद तरी करत होता किंवा बारीक तरी. दोन चारदा असं झाल्यावर मग त्यानं त्याकडं दुर्लक्ष करायला सुरुवात केली. पण त्यात त्रासिकपणा अजिबात नव्हता.

**'क**थे...' मधे निळू जो मंत्री उभा करतो तो म्हणजे बाळासाहेब देसाईंची नक्कल आहे किंवा बाबूराव जगतापांची नक्कल आहे असं काही लोक मानतात. (आणि निळूला जरा कमी लेखायचं असलं की 'नक्कल म्हणजे काय अभिनय आहे?' असं त्यातले काहीजण विचारतात.) निळू म्हणाला, मुळात मी या माणसांना जवळून पाहिलेलं नाही आणि दुसरं म्हणजे हे लोक माझ्या डोक्यातही नव्हते. जिल्हा परिषदांमधली काही माणसं मात्र मी पाहिलेली होती. त्या माणसांच्या ठशांमधूनच मी या पात्रांच्या लकबी घेतल्या. मस्तवालपणा, बेफिकीरी, सुस्तपणा या वैशिष्ट्यांनिशी हा मंत्री उभा केला पाहिजे असं मला वाटलं आणि तसा मी तो केला. यासाठी काही संवादही मी लेखकाला सुचवले.

नक्कल वगैरे गोष्टींबद्दल बोलताना निळू म्हणाला की काही वेळा जाणूनबुजून असेल किंवा काही वेळा नकळत असेल कलावंत स्वतःवर अनेक व्यक्तींचे संस्कार घेत असतोच. आणि एखाद्या भूमिकेची त्याची समज प्रत्यक्षात आणण्यासाठी तो या संस्कारांचा उपयोग करतोच.

काहीही करून लोकांना सक्तीनं हसायला लावायचं हे निळूला मान्य नाही. विनोद हा सहज प्रसंगानुरूप जायला हवा असं तो म्हणतो. त्यामुळं कुठल्याही प्रकारचे मुद्दाम घुसडलेले विनोद त्याला आवडत नाहीत.( उदा. सिनेमानाटकांच्या नावांवरून केलेले विनोद. )

हजरजबाबीपणाबद्दल विचारलं तेव्हा त्यानं विठाचं एक उदाहरण दिलं. ती दलालाला सांगत असते, एखादं चांगलंसं गिऱ्हाईक घेऊन ये. तर प्रेक्षकांतून आवाज आला ' पठाण आण पठाण. ' तिनं त्या दलालाला परत बोलावलं, म्हणाली, ' दोन पठाण आण. एक मला लागल, एक त्याच्या आईला !' हा हजरजबाबीपणा आहे आणि तो कलावंत आणि प्रेक्षक यांच्यातल्या एका निर्भय मोकळेपणाच्या नात्यातून आलेला आहे.

निळू म्हणाला की हल्ली प्रसिध्दी पावलेला हजरजबाबीपणा हा बहुतेक वेळा पूर्वनियोजित असतो. हजरजबाबी होणं तसं सोपं आहे.

**'मु**क्काम पोस्ट ढेबेवाडी 'चं चित्रीकरण चालू होतं. हा झोपतो वगैरे काही शॉट होता. हा शॉट इतका स्वाभाविक झाला की काही विचारू नका. कारण झोपण्याचा अभिनय करता करता हा खरोखरच झोपी गेला...

**लो**कनाट्य--तमाशा वा सिनेमात थोड्याफार फरकानं तसंच काही -- असं काही क्षेत्र स्वतःसाठी आखून घेतलेलं आहे काय या प्रश्नाचं उत्तर निळूनं ' नाही ' असं दिलं. या संदर्भात लोकनाट्य या माध्यमाबद्दल निळूनं आपले विचार सांगितले.

तो म्हणाला की मराठी नाटकाच्या तुलनेनं हे फारच मोकळेपणानं वापरता येण्यासारखं माध्यम आहे. मराठीतलं नाटक हे फारच बंदिस्त, ठोकळेबाज आणि गुळगुळीत झालेलं आहे. या पार्श्वभूमीवर तर लोकनाट्याच्या शक्यता फारच प्रभावीपणे जाणवतात.

लोकनाट्य हे ॲब्सर्डला -- विसंगतीच्या नाट्याला फार जवळ असलेलं माध्यम आहे. इथं नव्या, अनपेक्षित गोष्टी स्वीकारायला लोक अधिक तयार असतात. या दृष्टीनंही विचार करता नाटकानं प्रेक्षकांना लावलेल्या कृत्रिमतेच्या सवयी ओलांडून प्रेक्षक अधिक सुजाण होण्यालाही या माध्यमाचा उपयोग होऊ शकेल असं वाटतं.

स्वगतं आणि भाष्यं यांच्या शक्यता नाटकापेक्षा कितीतरी पटींनी इथं वाढू शकतात. ( या संदर्भात निळूनं 'आल्फी ' या चित्रपटातलं पात्र कसं कॉमेन्ट्स टाकत असतं वगैरे सांगितलं. )

नेहमीच्या नात्यांचा येणारा कंटाळाही नाटकांनी नाकारलेला आहे. इथं सगळीच नाती विस्कटून एखाद्या अनपेक्षित स्फोटासारखी तुमच्यापुढं येऊ शकतात. आणि या प्रकारातून तुमच्या नेहमीच्या नात्यांवर अगदी वेगळाच झोत पडण्याचीही शक्यता असते.

**या** लेखातले बरेच प्रसंग इकडून तिकडून जमवलेलेच आहेत. ते काही निळूच्या तोंडून घेता आलेले नाहीत. कारण तुम्ही तसं काही विचारलंत की निळू अजिबात काही आठवत नसल्यासारखा चेहरा करून बसतो. जाम बोलेनासा होतो...पण त्याची अनेक दोस्तमंडळी तर बोलू शकतात !

**हॅ**म्लेट-- किंवा लैलामजनू सारखी थीम्स निळूला खूपदा खोटी वाटतात. यांची विडंबनं सादर व्हायला हवीत असा एक त्याचा विचार आहे.

**श**रदबाबूंचे सगळेच नायक निळूला भारावून टाकतात. विशेषतः ' देवदास ' आणि ' श्रीकांत '. ' श्रीकांत ' प्रथम वाचली तेव्हा निळू पार खलास होऊन गेला होता.

**का**र्यक्रमाच्या मोबदल्यातली वारेमाप तफावत ( उदा.१० पासून २५० रुपयांपर्यंत ) हा एक निळूच्या चिडीचा विषय.

**सं**युक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या सुमारास पथक दिल्लीला गेलं होतं. तिथल्या कार्यक्रमाला पंडित नेहरू उपस्थित राहिले होते. त्यावेळी नेहरूंच्या एकूणच व्यक्तिमत्वावर भाळून अनेकांनी त्यांना मिठ्या मारण्याचे वगैरे प्रकार केले. निळूला ते अजिबात आवडलं नाही. आपले मतभेद विसरावे आणि एखाद्या व्यक्तिमत्वाला व्यक्तिमत्व म्हणून महत्त्व द्यावं हे निळूला रुचलं नाही. नेहरूंसमवेत काढलेल्या फोटोतसुध्दा तो कुठंतरी कडेकडेला उभा असलेला दिसतो.

**का**ही काही वेळेला निळू फार उदास होतो. त्याला विशेष कशाचाही उत्साह राहात नाही. मिळणाऱ्या रकमेवर लक्ष ठेवून तो काम करत राहतो. याहून वेगळं काही करावं, आपल्याला आवडणाऱ्या काही गोष्टी अजून आपण केलेल्याच नाहीत -- असे सगळेच विचार फोल वाटायला लागतात.

**चि**त्रपटातल्या स्वतःच्या अभिनयाबद्दल निळू बराच निराश आहे. तो म्हणतो की ' मु.पो.ढेबेवाडी ' तले काही शॉट्स तेवढे मी बरे केले आहेत. बाकी समाधानकारक अजून काही नाही.

**नि**ळू एक अगदी साधा, साध्या पोषाखात वावरणारा माणूस आहे. रस्त्यात तो तुमच्या जवळून गेला तरी तुमच्या लक्षातही यायचं नाही.

चष्मा लावल्यावर निळू एखाद्या खूप अभ्यास करणाऱ्या कॉलेज विद्यार्थ्यासारखा दिसतो.

विशेष जाणवणारं निळूचं अधिक सूक्ष्म वैशिष्टय म्हणजे स्वतःला तो अगदी सहजपणे वाहतो. त्याच्याशी बोलताना या सहजपणाची खोली आपल्याला जाणवत राहते.

**अं**गविक्षेप आणि शाब्दिक थिल्लरपणाचे विनोद निळूला आवडत नाहीत. दर्जेदार विनोद कोणता ते सांगताना त्यानं मा.विनायकांचं उदाहरण दिलं. चार्ली चॅप्लीन सोडला तर ही ताकद दुसऱ्या कुणाकडंही नाही -- असं त्याचं म्हणणं.

धोबी राजा होतो. आणि राजा झाल्या झाल्या त्याचा पाहिला प्रश्न काय तर सोड्याचा भाव काय ? किंवा स्वतःच्या अंगावरच्या राजपोषाखाकडे पाहून तो प्रधानजीला विचारतो, 'काय प्रधानजी, हे कपडे कुठल्या धोब्याकडे दिलेवते ? का अंगाखाली घेऊन झोपला होता ? ' -- हे चांगले विनोद आहेत.

**स्व**तःचं एक प्रॉडक्शन निर्माण करावं आणि आपल्याला आवडणाऱ्या काही गोष्टी धाडसानं कराव्या असं निळूला वाटतं. त्याच्या काही मित्रांनी याची संपूर्ण आर्थिक जबाबदारी उचलण्याचीही तयारी दाखवलेली आहे.

या बाबतीत निळूनं एक मजेदार भीती बोलून दाखवली. त्याला असं वाटतं की त्याचा इकडचा प्रेक्षक त्याच्याकडच्या त्यांच्या अपेक्षा घेऊन तिकडेही गर्दी करायचा आणि मग एकादवेळेस भलताच बैदा उडून जायचा.

' हे तसं काही नाही रे बाबांनो ' अशी व्यवस्थित जाहिरात करूनच हे करावं लागेल.

चित्रपटाविषयीही निळूकडे काही वेगळ्या कल्पना आहेत.

**कु**ठल्याही माणसावर निळूनं एक व्यक्ती म्हणून प्रेम केलेलं नाही. त्याच्या विचारांवर प्रेम केलेलं आहे. अर्थात मित्रांची गोष्ट वेगळी असते. तिथं विचार महत्त्वाचे नसतात तर आपुलकी महत्त्वाची असते.

निळू कुठलाही -- किंवा कुठलेही -- आदर्श वगैरे मानत नाही. आणि या अर्थानं तो कुणाला गुरूही मानत नाही. तसं पाहिलं तर कुणी कुणाचा गूरू असूच शकत नाही असं तो म्हणतो.

**अ**लिकडचं निळूचं वाचन म्हणजे भाऊ पाध्ये, खानोलकरांची ' रात्र काळी घागर काळी ', मर्ढेकरांच्या कविता आणि ' सौंदर्य आणि साहित्य,' विंदा करंदीकर, पु.शि.रेग्यांची ' सावित्री' , ' नाटककाराच्या शोधात सहा पात्रे ', वगैरे.

अशोक शहाणेनं मधेच त्याला गोडसे भटजींचं ' माझा प्रवास ' आणून दिलं. तेही निळूला बेफाम आवडलं.

' ठगांची जबानी ' हे एक निळूचं आवडतं पुस्तक.

**नि**र्मला अरुण, बेगम अख्तर, एस.डी.बर्मन यांची बंगाली भजनं, कुमार गंधर्वांचं ' आज मी रुसून आहे '...

**मा**णसाच्या आयुष्यातली विसंगती, निरर्थकता, गोंधळ या सगळ्या गोष्टी जर प्रखरपणे जाणवत असतील तर मग जगण्याला तरी काय अर्थ आहे - जगायचं तरी कशासाठी ?

निळू म्हणाला, खरं आहे. जीवन हे जर खरोखरच ओझं व्हायला लागलं तर आत्महत्या ही एक सर्वात सोपी गोष्ट आहे. नुसत्या आत्महत्येच्या विचारानंसुध्दा माझ्या मनाला खूप शांतता मिळते असं तो म्हणाला.

याउलट, काही वेळेला, तो म्हणाला की मी पूर्णपणे बेछूट होतो. 'बस्स, आजचा दिवस आहे, भोगून घे ' -- अशी

वृत्ती होते. पण अर्थात ही काही कायम स्वरूपाची भावना नसते हेही त्यानं सांगितलं.

**पू**र्वी निळूची खूप फिरस्ती झालेली आहे. धंद्याची बंधनं नसलेली ती भटकंती होती. पण आता धंद्याच्या निमित्तानं होणारा प्रवास तसा नसतो. या प्रवासाचा निळूला फार कंटाळा आहे.

**पू**र्वी निळूनं विवेकानंद वाचलेले आहेत. पण त्यात बराच भावनेचा भाग होता असं तो म्हणतो. थोडीशी बुध्दीची पक्वता वगैरे आलेल्या परिस्थितीत अलिकडे त्यानं जे .कृष्णमूर्ती वाचलेले आहेत.

**इ**स्त्राएल, हो चि मिन्ह, चीनमधली क्रांती या निळूच्या आदराच्या गोष्टी आहेत. तसं नेतृत्व, तो आचार आपल्याकडे नाही ही निळूला अगदी निराशाजनक परिस्थिती वाटते. आपल्याकडच्या कम्युनिस्टांमधे सुध्दा तसा आचार नाही असं तो म्हणतो.

**हिं**दुस्थानात धर्माचं प्राबल्यही खूप आहे आणि इथं माणुसकीविषयी वगैरे बोललंही खूप जातं. पण, निळू म्हणतो, माणुसकीशी इथल्याइतकं घाणेरडं वर्तन कुठं होत असेल असं वाटतं नाही.

आपल्या घरच्या माणसाला जर दोन वेळा जेवायला मिळत नसेल तर आपण एवढी चैन करणं बरं नव्हे -- हा संबंध कुणी पाहात नाही.

हंगेरीत महायुध्दानंतर जे मदतकार्य होतं तशा स्वरूपाचं कार्य भारतात दुष्काळग्रस्त भागात आणि इतरत्रही भुकेल्यांसाठी सुरू करावं असं लोहियांचं मत होतं. त्यात काही लोक काम न करता इकडेच धावण्याची शक्यता गृहीत धरूनसुध्दा हे करायला हवं असं त्यांचं मत होतं. या निळूला पूर्णपणे पटणाऱ्या गोष्टी.

**सं**पन्न पण सगळेच नाकारू शकणारा म्हणून कफल्लक, उदास पण लोभस, एक साधा माणूस -- एवढ्या वर्णनात फुले बराचसा सापडतो. पण झालं, फुले कळला, पुढे चला -- असा तो कधीच सापडू शकत नाही. तो जेवढा कळतो त्याहून खूपच खोल कुठे नुसता जाणवतो.

आता या माणसाकडून काय आपण -- धंद्यात आणखी आणखी यशस्वी व्हावा, हिंदीत चमकावा, जमल्यास इंग्रजीत जावा -- एवढ्याच अपेक्षा करणार ? हे सगळं व्हावं, जरूर व्हावं, पण निळूनं कधीतरी स्वतःला खरोखर भिडणारं काहीतरी घेऊन प्रखरपणे उभं राह्यला हवं -- ही अपेक्षा आपण केलीच पाहिजे.

पण आपण आपल्या प्रेमाचा रेटा त्याच्यावर आणू शकतो हे जरी खरं असलं तरी ...तरी ...

तो काय काय करतो ते पाहात राह्यचं एवढंच आपल्या हातात आहे.

( सुयोग साधना, दीपावली ६९ )

-0-0-0-0-

( वरील लेख, चं.प्र.देशपांडे यांनी निळू फुले यांची घेतलेली मुलाखत व ठिकठिकाणांहून मिळविलेली माहिती यांवर आधारलेला आहे.)

पत्ता :-- चं.प्र.देशपांडे,
३, स्नेहदीप अपा., सावरकर पथ, पर्वती, सहकारनगर नं.२, पुणे -- ४११००९.

**दूरध्वनी : -- ४२२ ७८४७. / २४२२७८४८. / ९३७१००५७७३.**